**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२४/२०२४ यातील निशाणी ४—अ वरील आदेश**

**१.** अर्जदारांनी फौजदारी संहिता कलम १२५(१) अन्वये प्रस्तुतचे प्रकरण अर्जदार क्र. ०१ व ०२ यांना दरमहा ४०,०००/— रुपये पोटगी मिळण्याकरीता दाखल केले आहे. तसेच प्रस्तुतचा अर्ज हा दरमहा ३०,०००/— रुपये अंतरीम पोटगी मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

अर्जदारांचे कथन थोडक्यात पुढील प्रमाणे:

**२.** अर्जदार क्र. ०१ हिचे लग्न गैरअर्जदारासोबत दिनांक २३.०५.२०१२ रोजी झाले. लग्नानंतर अर्जदार क्र.०१ ही गैरअर्जदारांच्या घरी नांदावयास गेली. काही दिवस त्यांचा संसार सुरळीत चालु होता. लग्नानंतर १५ दिवसांनी गैरअर्जदार हा परस्त्रीसोबत फोनवर बोलत होता, त्याबाबत अर्जदार हिने विचारणा केली असता त्याने तिला बाचाबाची केली. त्यानंतर त्याचे वैशाली या मुलीसोबत लग्नापूर्वीपासून संबंध असल्याचे गैरअर्जदाराने तिला सांगितले. तसेच लग्नात आई—वडीलांनी मानपान केला नाही असे गैरअर्जदार तिला म्हणत असे. गैरअर्जदाराचे वैशाली नावाच्या मुलीसोबत असलेल्या संबंधाबाबत अर्जदाराने तिचे सासु—सासरे, दिर, ननंद यांना सांगितले असता त्या सर्वांनी गैरअर्जदाराची बाजु घेतली. दिनांक ०४/०५/२०१४ रोजी सकाळी १०.०० वाजता गैरअर्जदाराला वैशाली या मुलीचा फोन आला, त्यावेळी गैरअर्जदाराने फोन न उचलल्यामुळे वैशाली ही त्यांच्या घरी आली. अर्जदाराने वैशाली हिस विरोध दर्शविला असता तिने अश्लील भाषेत शिवीगाळ केली, जिवे मारण्याची व आत्महत्या करण्याची धमकी दिली. त्याबाबत अर्जदाराने दिनांक १३/०५/२०१४ रोजी पोलीस निरीक्षक, गिट्टी खदान नागपूर यांच्याकडे तक्रार दाखल केली. त्यामुळे चिडून वैशाली ही संध्याकाळी पुन्हा अर्जदाराच्या घरी आली व तिला मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. सन २०१४ साली अर्जदार गरोदर असतांना तिचा गर्भ पाडण्यासाठी गैरअर्जदाराने वारंवार प्रयत्न केले. मुलीच्या जन्मानंतर अर्जदार ही नागपूर येथे नांदावयास गेली असता त्यानंतर देखील गैरअर्जदाराने तिला मारहाण केली. गैरअर्जदाराच्या घरातील लोक हे गैरअर्जदारास मारहाण करण्याकरीता प्रोत्साहन देत असत.

**३.** अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, सन २०१९ मध्ये गैरअर्जदाराने झिंगाबाय टाकळी येथे फ्लॅट घेण्याचा सौदा केला होता व त्यावेळी त्याने अर्जदारास माहेरावरुन रक्कम रुपये ५,००,०००/— आणण्यास सांगितले. तिच्या

आई—वडीलांची परिस्थिती पैसे देण्याची नसल्याचे तिने सांगितले असता गैरअर्जदार व त्याच्या नातेवाईकांनी अर्जदारास शिवीगाळ केली. त्याबाबत अर्जदाराने तिचे आई—वडील व भाउ यांना सांगितले असता दिनांक ०६/१२/२०१९ रोजी तिच्या आई—वडीलांनी रक्कम रुपये २,००,०००/— गैरअर्जदारास दिले. त्यानंतर देखील रक्कम रुपये ३,००,०००/— माहेरावरुन आणण्यासाठी गैरअर्जदार व त्याचे नातेवाईक अर्जदारास तगादा लावीत असत दिनांक ०१/०१/२०२० व ०२/०१/२०२० रोजी गैरअर्जदाराने शुल्लक कारणावरुन अर्जदारास मारहाण केली व घरात डांबून ठेवले. दिनांक ०३/०१/२०२० रोजी अर्जदार ही डॉक्टर नईद खान यांच्या दवाखान्यात गेली व तेथुन तिने फोन करुन वडीलांना सर्व हकीगत सांगितली. त्यानंतर दिनांक ०४/०१/२०२० रोजी अर्जदाराचे वडील व भाउ नागपूर येथे आले व तिला उपचाराकरीता मंगरुळपीर येथे आणले. त्यानंतर दिनांक २८/०२/२०२० रोजी अर्जदाराने गैरअर्जदार व त्याच्या नातेवाईकांविरुध्द तक्रार दिली. त्या तक्रारीवरुन प्रकरण महिला समुपदेशन केंद्राकडे असतांना गैरअर्जदार हजर झाला व त्याने भविष्यात अर्जदारास चांगली वागणुक देईल आणि वैशाली हिच्यापासून विभक्त राहिल अशी हमी देवून तक्रार मागे घेण्यास सांगितले. अर्जदारास संसार करावयाचा असल्यामुळे तिने तक्रार मागे घेतली. त्यानंतर देखील गैरअर्जदार व त्याचे नातेवाईक यांच्या वागण्यात कोणताही फरक पडला नाही. दिनांक ०१/०१/२०२२ रोजी सकाळी ८.०० वाजता गैरअर्जदार हा कर्तव्यावर जातो असे सांगून घरातून गेला, परंतू त्याची गाडी घरासमोर उभी असल्याचे बघून अर्जदार हिने वैशाली हिच्या क्वॉर्टरवर जावून पाहिले असता गैरअर्जदार व वैशाली नको त्या अवस्थेत दिसून आले. गैरअर्जदाराने त्यावेळी तिला अश्लील भाषेत शिवीगाळ करुन ओढत घरी आणले. अर्जदाराच्या वडीलांनी लग्नामध्ये दिलेले दागिने वैशाली हिच्या अंगावर होते. गैरअर्जदाराने वाडी येथे १००० चौरस फुटाचा प्लॉट घेण्याचा सौदा केला होता, त्याकरीता त्याने अर्जदारास माहेरावरुन रक्कम रुपये ४,००,०००/— आणण्याची मागणी केली. दिनांक २६/०८/२०२३ रोजी गैरअर्जदाराने दारु पिवून अर्जदार व मुलीला मारहाण केली आणि घराबाहेर हाकलुन दिले. तेव्हापासून अर्जदार माहेरी राहते. गैरअर्जदाराने त्यांच्या पालनपोषणाची, औषधोपचाराची अथवा इतर कोणतीही व्यवस्था केलेली नाही. तिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदार हा पोलीस खात्यात नोकरीस असून त्याला दरमहा ७०,०००/— रुपये पगार मिळतो. त्याच्याकडे झिंगाबाय टाकळी येथे फॅलट असून त्याला दरमहा १५,०००/— रुपये

भाडयाचे उत्पन्न मिळते. त्याच्यावर पत्नी व मुलगी यांच्या व्यतिरिक्त कोणाचीही जबाबदारी नाही. त्यामुळे अंतरीम पोटगी मंजुर करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

४. गैरअर्जदार हा हजर होवुन त्याने मुळ अर्जावर त्याचे म्हणणे निशाणी १४ कडे दाखल केले आहे. अर्जदाराने कथन केलेले नातेसंबंध त्याला मान्य आहेत. अर्जात कथन केलेल्या इतर सर्व बाबी त्याने नाकारलेल्या आहेत. त्याच्या कथनानुसार, लग्नानंतर अर्जदाराने केवळ १० ते १२ दिवस त्याच्या आई वडीलांसोबत वास्तव्य केले. तो नागपुर येथे पोलिस विभागात नोकरीला असल्याने लग्नानंतर लगेचच ते नागपुर येथे राहण्यास गेले. लग्नानंतर अर्जदार ही अमरावती येथे राहत असतांना किरकोळ घरगुती कारणावरुन वाद करीत असे, एकत्र कुटुंबात राहायचे नाही असे म्हणत असे. अर्जदाराने त्याच्या आई वडीलांना अपमानास्पद वागणुक दिली. लग्नानंतर सुरुवातीपासुनच अर्जदारास माहेरील ओढा होता. अर्जदार ही रागिट, भांडखोर व संशयी वृत्तीची होती. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदाराच्या नातेवाईकांशी अपमानास्पद वागुन अश्लिल भाषेत शिवीगाळ करित असे. तसेच आत्महत्या करुन गैरअर्जदार व त्याच्या नातेवाईकांना खोट्या प्रकरणात अडकविण्याची धमकी देत असे. तो अर्जदार व मुलीची सर्व प्रकारे काळजी घेत असे व त्यांच्या सर्व गरजा पुरवित असे. तो पोलिस खात्यात नोकरीस असल्यामुळे त्याला रात्री अपरात्री कर्तव्यावर जावे लागत असे, परंतु अर्जदार क्र.१ ही त्याला जेवणाचा डब्बा व इतर आवश्यक वस्तु देण्यास टाळाटाळ करित असे. अर्जदार क्र. १ हिच्या आई—वडीलांचा देखील त्यांच्या संसारात मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप होता. त्याने अर्जदार क्र. १ हिचा संपुर्ण शारीरिक व मानसीक त्रास सहन केला, परंतु अर्जदार क्र १ हिच्या वागण्यात कोणताही बदल झाला नाही.

५. त्याचे पुढे असे कथन आहे की, त्याचे विवाहबाह्य संबंध नाहित. अर्जदार क्र. १ ही संशयी असुन त्याच्यावर विनाकारण खोटे आरोप लावत होती व वाद उपस्थित करित असे. त्याने अर्जदार क्र. १ हिस कोणताही शारीरिक, मानसीक व आर्थिक त्रास दिलेला नाही. अर्जदार क्र. १ ही तिच्या गर्भपिशवीची शस्त्रक्रिया केल्याचे सांगुन दिनांक २७/०८/२०२३ रोजीपासुन तिच्या आई—वडीलांच्या चिथावणीला बळी पडुन माहेरी राहत आहे. तो आज देखील अर्जदार क्र १ हिस नांदविण्यास तयार आहे. अर्जदार क्र १ हिने भारतीय दंड विधान कलम ४९८—अ

अन्वये तक्रार दिली असुन त्यामध्ये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. अर्जदार क्र १ हिने कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम अन्वये अर्ज क्र. ४५/२०२३ दाखल केला आहे. त्याला रक्कम रुपये ४८,५००/— दरमहा पगार मिळतो. त्याने डि.एच.एफ.एल. कंपनीचे गृहकर्ज घेतलेले असुन त्यापोटी त्याला रक्कम रु १२,५००/— मासीक हप्ता भरावा लागतो. त्याने एल.आय.सी. पॉलिसी काढली असुन त्याबाबत वार्षिक हप्ता रक्कम रु २७,०००/— त्याला भरावा लागतो. तसेच मॅक्स लाईफ विमा कंपनीच्या पॉलिसीचा वार्षिक रक्कम रु १,०२,०००/— हप्ता त्याला भरावा लागतो. त्याला दरमहा रक्कम रु २०,०००/— ते २५,०००/— अन्न वस्त्र व निवारा याकरिता खर्च करावे लागतात. त्याचा झिंगाबाई टाकळी येथे प्लॉट असुन तो रिकामा आहे. याउलट अर्जदार क्र १ हिचे पदवीपर्यंत शिक्षण झाले असुन ती सध्या खाजगी संस्थेत शिक्षीकेची नोकरी करते व त्यातुन तिला दरमहा रक्कम रु १०,०००/— पगार मिळतो. अर्जदार क्र. १ हिच्या कुटुंबाकडे बागायती शेतजमिन आहे. त्यामुळे अर्ज खारीज करण्याची विनंती ते करतात.

**६.** अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे आणि अर्जदार व गैरअर्जदार यांनी दाखल केलेल्या मालमत्ता व दायीत्व याबाबत शपथपत्रांचे अवलोकन केले.

**७.** अर्जदार व गैरअर्जदार यांचे परस्परविरोधी कथन, उभयपक्षांच्या वकीलांनी केलेला युक्तीवाद व अभिलेखावर दाखल करण्यात आलेले कागदपत्र यावरून खालील प्रश्नबिंदू माझे विचारार्थ उपस्थित होतात. त्यावरील माझे निष्कर्ष मी खालील कारणमिमांसेसह देत आहे.

| **अ.क्र.** | **प्रश्नबिंदू** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्जदारांनी प्रार्थिल्याप्रमाणे मुळ अर्जाच्या निकालापर्यत अंतरिम आदेश म्हणुन दरमहा रक्कम रूपये ३०,०००/— तूर्तातूर्त पोटगी मिळण्यास ते पात्र आहेत काय? | अंशतः होकारार्थी |
| २ | काय आदेश | अंतिम आदेशानुसार |

## कारणमिमांसा

**प्रश्नबिंदू क्र. १ करीता :—**

८. अर्जदाराच्या कथनानुसार गैरअर्जदाराचे वैशाली या स्त्रीसोबत अनैतिक संबंध आहेत, गैरअर्जदार हा तिला माहेरावरुन पैसे आणण्याची मागणी करीत असे, तिचा शारिरीक व मानसिक छळ करीत असे, अश्लील भाषेत शिवीगाळ करीत असे. याउलट गैरअर्जदाराच्या कथनानुसार अर्जदार ही घरगुती कारणावरुन त्याच्या नातेवाईकांसोबत वाद घालत असे, ती संशयी वृत्तीची असून घरातील काम करीत नसे. गैरअर्जदाराचे पुढे असे देखील कथन आहे की, अर्जदार ही पोटाच्या शस्त्रक्रियेचे कारण सांगुन स्वत:हुन माहेरी गेली आहे, तिला उत्पन्नाचे साधन आहे.

९. अर्जदार व गैरअर्जदार यांचे कथनावरुन त्यांच्यातील नातेसंबंध विवादीत नाहीत. अर्जदार क्र.०१ व गैरअर्जदार हे पती—पत्नी असून अर्जदार क्र.०२ ही त्यांची मुलगी आहे. गैरअर्जदार हा पोलीस विभागात नागपूर येथे नोकरीस आहे.

१०. अर्जदाराने अर्जात तिला होत असलेल्या त्रासाबाबत सविस्तर वर्णन केले आहे. अर्जदाराने अर्जात कथन केलेल्या बाबी प्रस्तुत अर्जाचा विचार करतेवेळी नाकारण्यास सबळ कारण नाही. याउलट, अर्जदार ही कोणत्याही कारणाशिवाय स्वत :हून माहेरी राहते हे गैरअर्जदाराचे कथन पटण्याजोगे नाही. कोणतीही विवाहीत स्त्री तिला ०९ वर्षाची मुलगी असतांना कोणत्याही कारणाशिवाय पतीचे घर सोडुन माहेरी राहणार नाही. त्यामुळे गैरअर्जदार यांनी नमूद केलेली बाब त्यांना सक्षम पुराव्याआधारे सिध्द करावी लागेल. अशा परिस्थितीत प्रस्तुत अर्जाचा विचार करतांना गैरअर्जदार यांनी कथन केलेल्या त्या बाबी कोणत्याही पुराव्याविना सदयपरीस्थितीत विचारात घेता येणार नाहीत.

११. अर्जदार क्र. २ ही अज्ञान असुन सदयपरिस्थितीत शिक्षण घेते. त्यामुळे निश्चितच अर्जदार क्र.०२ हिस उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. सदयपरीस्थितीत अर्जदार क्र.०२ ही अर्जदार क्र. १ सोबत राहत असल्याचे उभयंतांना मान्य आहे. अर्जदार क्र.०१ हि शिक्षीका असून तिला दरमहा १०,०००/— रुपये पगार मिळतो असे गैरअर्जदाराचे कथन असले तरी त्याबाबत त्याने अभिलेखावर कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाहीत. त्याचप्रमाणे अर्जदार क्र.०१ ही कोणत्या शाळेवर व कधीपासून शिक्षीका म्हणून काम करते याबाबत देखील गैरअर्जदाराने कोणताही तपशिल दिलेला नाही.

**१२.** अर्जदाराने तिचे मालमत्ता व दायीत्वाचे शपथपत्र निशाणी क्र.१३ कडे दाखल केलेले आहे. त्यामध्ये तिने तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याचे स्पष्टपणे नमुद केलेले आहे. अशा परिस्थितीत, अर्जदार ही खाजगी शाळेवर शिक्षीका असून तिला दरमहा १०,०००/— रुपये उत्पन्न मिळते ही बाब मानता येणार नाही.

**१३.** यापुर्वीच नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदार हा पोलीस खात्यात नोकरीस असल्याची बाब विवादीत नाही. सदर नोकरीतून त्याला वार्षीक ९,००,०००/— रुपये उत्पन्न मिळत असल्याचे अर्जदाराचे कथन आहे. गैरअर्जदाराने त्याचे मालमत्ता व दायीत्व शपथपत्र निशाणी क्र.१७ कडे सादर केलेले आहे. त्यामध्ये त्याने त्याचे मासिक उत्पन्न ५१,०००/— रुपये असल्याचे दर्शविलेले आहे. गैरअर्जदाराने निशाणी क्र.१६ कडील कागदपत्रांच्या यादीसोबत जुलै—२०२४, ऑगष्ट—२०२४, सप्टेंबर —२०२४ या महिन्यांचे पगारपत्रक सादर केलेले आहे. त्यावरुन गैरअर्जदारास दरमहा ५१,०००/— मासिक पगार जमा होत असल्याचे दिसून येते. गैरअर्जदाराने गृहकर्जाबाबत, मॅक्स लाईफ पॉलीसीबाबत व एल.आय.सी पॉलीसीबाबत त्याला रक्कम भरावी लागत असल्याचे कागदपत्र दाखल केलेले आहेत. त्यांचे अवलोकन केले असता गैरअर्जदाराने मार्च—२०१८ पासून गृहकर्ज घेतले असल्याचे व सदयपरिस्थितीत त्याबाबत तो दरमहा १२,५००/— रुपये कर्जाचा हप्ता भरत असल्याचे दिसून येते. तसेच तो वार्षीक रक्कम रुपये १,१०,०००/— मॅक्स लाईफ इन्सुरंस पॉलीसीचा हप्ता भरत असल्याचे दिसून येते. त्याचावर त्याच्या आई—वडीलांची जबाबदारी असल्याचे गैरअर्जदाराचे कथन आहे. गैरअर्जदाराचे आई—वडील यांना कोणतेही स्वतंत्र उत्पन्न असल्याबाबत अर्जदाराचे कथन नाही. त्यामुळे निश्चितच गैरअर्जदाराला त्याच्या आई—वडीलांच्या पालनपोषणासाठी खर्च करावा लागतो ही बाब मानावी लागेल.

**१४.** अर्जदारांच्या उदरनिर्वाहासाठी गैरअर्जदाराने कोणतीही व्यवस्था केल्याचे त्याचे कथन नाही. पत्नीचा व मुलीचा सांभाळ करण्याची गैरअर्जदाराची जबाबदारी आहे. अर्जदार क्र.०१ हिच्या आई—वडीलांकडे उत्पन्नाची साधने असली तरी पत्नीचा व मुलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी ही पतीवर आहे.

**१५.** गैरअर्जदाराने जुलै—२०२४ ते सप्टेंबर—२०२४ या कालावधितील त्याचे पगारपत्रक दाखल केलेले आहेत. त्यानंतर ०१ वर्षापेक्षा जास्त कालावधी

उलटुन गेलेला आहे. त्यामुळे त्याच्या पगारात देखील निश्चितच वाढ झालेली असेल. त्याने कर्ज काढुन घर घेतलेले असले तरी त्यातून त्याला निश्चितच उत्पन्न मिळत असेल. त्या उत्पन्नाबाबत त्याने मालमत्ता व दायीत्व शपथपत्रात अथवा अर्जावर दाखल केलेल्या लेखी उत्तरात कोणतेही कथन केलेले नाही.

**१६.** अर्जदाराने मुळ अर्जावर दाखल केलेल्या लेखी उत्तरावरुन तो पोलीस क्वार्टर, नागपूर येथे राहत असल्याचे दिसून येते. याउलट, त्याच्या मालमत्ता व दायीत्व शपथपत्रामध्ये त्याला घराच्या भाडयापोटी दरमहा ६५००/— रुपये खर्च करावे लागत असल्याचे त्याने सांगितले आहे. यावरुन त्याने खरी माहिती न्यायालयापासून दडवून ठेवल्याचे दिसून येते.

**१७.** पुढील महत्वाची बाब म्हणजे अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम अन्वये अर्ज दाखल केलेला आहे व त्यामध्ये अर्जदार क्र.०१ व ०२ यांना दरमहा प्रत्येकी ५०००/— रुपये पोटगी मंजुर झाल्याचे गैरअर्जदाराचे कथन आहे. त्याबाबत कौटुंबीक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम अर्ज क्र.४५/२०२३ यातील दिनांक ०२/०८/२०२५ रोजीचा आदेश गैरअर्जदाराने दाखल केलेला आहे. त्यावरुन अर्जदार क्र. ०१ व ०२ यांना प्रत्येकी ५०००/— रुपये अंतरीम खावटी मंजुर झाल्याचे दिसून येते.

**१८.** अर्जदारांना सदर प्रकरणात अंतरीम खावटी मंजुर झाली या कारणास्तव प्रस्तुत प्रकरणात ते अंतरीम पोटगी मिळण्यासाठी पात्र ठरत नाहीत असे मानता येणार नाही. अर्जदार क्र.०२ हिच्या शिक्षणासाठी सदयपरिस्थितीत निश्चितच जास्त खर्च येतो याबाबत दुमत नाही. गैरअर्जदार हा पोलीस खात्यात नोकरीस असून तो ज्या पध्दतीने जिवन जगतो त्याच पध्दतीने अर्जदारांना आवश्यक ती साधने मिळणे अपेक्षीत आहे. त्यामुळे कौटुंबीक हिंसाचारान्वये दाखल केलेल्या प्रकरणात मंजुर करण्यात आलेली अंतरीम पोटगी ही निश्चितच अर्जदारांचे राहणीमान, शिक्षण, वैद्यकीय खर्च व इतर खर्च याकरीता पुरेशी नाही असे माझे मत आहे.

**१९.** त्यामुळे गैरअर्जदारास मिळणारे उत्पन्न विचारात घेता गैरअर्जदार हा अर्जदारांना प्रस्तुत मुळ अर्जाच्या निकालापर्यंत तात्पुरती पोटगी देण्यास सक्षम असल्याचे दिसून येते. गैरअर्जदाराचे उत्पन्न, त्याच्या जबाबदाऱ्या यांचा मेळ घालुन गैरअर्जदार हा निश्चितच अर्जदारांना प्रस्तुत प्रकरणात अंतरीम पोटगी देण्यास सक्षम आहे. वरील सर्व कारणांमुळे मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत अर्जदार क्र. १ व २

अंतरिम पोटगी मिळण्यास हक्कदार आहेत. त्यामुळे अर्जदार क्र. १ हिस दरमहा रक्कम रूपये ४०००/— (चार हजार रूपये) व अर्जदार क्र. २ हिस दरमहा रक्कम रूपये ३०००/— (तीन हजार रूपये) अंतरिम पोटगी अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासुन मंजूर करणे योग्य वाटते. अशा परिस्थितीत मी प्रश्नबिंदू क्र. १ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदवत आहे व प्रश्नबिंदू क्र. २ चे उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

(१) अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो.

(२) गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र. १ हिस दरमहा रक्कम रूपये ४०००/— (चार हजार रूपये) व अर्जदार क्र. २ हिस दरमहा रक्कम रूपये ३०००/— (तीन हजार रूपये) अंतरिम पोटगी म्हणून मुळ अर्ज दाखल तारखेपासून निकाल लागेपर्यत द्यावी.

स्वा/—
(सुभाष द. तारे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगरुळपीर

मंगरुळपीर
दिनांक:— १३/१०/२०२५

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | :- | 2nd Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Mangrulpir, Dist. Washim. |
| Presiding Officer | :- | Subhash D. Tare |
| Judgment uploaded by | :- | A. B. Padole (Stenographer L.G) |
| Date of Judgment | :- | 13.10.2025 |
| Judgment/Order signed by the presiding officer on | :- | 13.10.2025 |
| Judgment/Order uploaded on | :- | 16.10.2025 |